**MEHUNBARE POLICE STATION**
मेहुणबारे पोलीस स्टेशन ता.चाळीसगाव जि.जळगाव LANDLINENO.-
०२५८९-२८६०२३
E-MAILID-Mehunbaraps@gmail.com

---

**प्रेस नोट**

दि. 22/05/2025

प्रति,

सर्व संपादक,
दैनिक वृत्तपत्र, साप्ताहीक, मासिक

**विषय - मेहुणबारे पोलीस स्टेशनकडून दिवसा घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणून चोरीस गेलेला संपूर्ण मुददेमाल हस्तगत केलेबाबत**

दि. 16/05/25 रोजीचे सकाळी 10/00 वाजताचे सुमारास ते दि. 18/05/25 रोजीचे रात्री 11/30 वाजताचे दरम्यान तक्रारदार नामे दिपक नामदेव पाटील, वय - 48 वर्षे, रा. देवळी, ता. चाळीसगांव हे त्यांचे कुटुंबियांस राहते घरास कुलूप लावून लग्नासाठी बाहेरगावी गेले होते. त्यादरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे घराचे दरवाजाचे कुलूप उघडून, घरात प्रवेश करून, लोखंडी शोकेश मधील लॉकर तोडून, त्यातून तक्रारदार यांचे 33 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम असा एकूण 3,25,000/- रूपये किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला बाबत तक्रारदार यांनी दि. 20/05/25 रोजी मेहूणबारे पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली होती. त्यांच्या तक्रारीवरून गुन्हा रजि. 116/25 भा.न्या.सं. कलम 331(3), 331(4), 305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

जिल्हा पोलीस अधिक्षक मा. डॉ. श्री महेश्वर रेडडी सो, अपर पोलीस अधिक्षक, चाळीसगांव मा. श्रीमती कविता नेरकर सो, व उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव उपविभाग, मा. श्री राजेशसिंह चंदेल सो, यांनी पोलीस स्टेशन हददीत घडणारे दिवसा व रात्रीच्या घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणून मुददेमाल हस्तगत करणे बाबत मार्गदर्शनपर सुचना दिल्या होत्या.

मा. वरिष्ठांच्या सुचनांप्रमाणे गुन्ह्याचा सखोल तपास करून गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणणेकामी प्रभारी अधिकारी श्री प्रविण अ. दातरे, सहायक पोलीस निरीक्षक यांनी पोलीस स्टेशन अधिकारी व अंमलदार यांचे एक पथक तयार केले होते. पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपणीय माहीतीच्या आधारे कौशल्याने सदरचा गुन्हा 06 तासात उघडकीस आणून, अशा प्रकारचे गुन्हे करणारा अभिलेखावरील आरोपी नामे प्रविण सुभाष पाटील, वय - 32 वर्षे, रा. बिलवाडी, ता. जि. जळगांव यास सदर गुन्हयात निष्पण्ण करून अटक करण्यात आली होती. त्यास मा. न्यायालयाकडून पोलीस कस्टडी रिमांड मध्ये घेवून, त्याचेकडे गुन्हयाचे अनुशंगाने तपास केला असता त्याने गुन्हयातील चोरी केलेले सोन्याचे दागीने एका सराफाकडून वितळवून घेतले असल्याचे तपासात निष्पण्ण झाले. सदरची वितळवलेल्या सोन्याची 33 ग्रॅम वजनाची, 3,20,000/- रूपये किंमतीची लगड नमुद आरोपीकडून जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी श्री प्रविण अ. दातरे, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उप-निरीक्षक श्री विकास शिरोळे व श्री सुहास आव्हाड, पोहेकॉ गोकूळ सोनवणे, किशोर पाटील, शांताराम पवार, पोकॉ विनोद बेलदार, संजय लाटे, निलेश लोहार यांनी केली आहे.

प्रविण अ. दातरे
सहा. पोलीस निरीक्षक
मेहूणबारे पोलीस स्टेशन


ISO9001:2008 मानांकित
फोन नं.-०२५८९-२८६०२३
मेहुणबारे पोलीस स्टेशन